CNR NO.MHRG090001002020.

सं.फौ. ख.क्र. ३८/२०२०
सरकार वि. भूरी पवार वगैरे.
नि.क्र.१४/ड

## अर्ज नि.क्र.१४ वर आदेश

प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे, कोलाड यांनी प्रस्तुत अर्ज दारुबंदी वारस गु.नो.क्र.७८/२०१९ मधील जप्त मुद्देमाल एक स्टीलची टाकी त्याचे झाकण उघडून पाहता त्यात गावठी हातभट्टीची तयार दारूचे फुगे सुमारे २० लिटर प्रती लिटर ५५/– प्रमाणे टाकीसह किंमत अंदाजे रुपये १,६१०/– या मुद्देमालाबाबत पोलीस ठाण्यात मुद्देमाल साठवणूकीसाठी जागा अपुरी असल्यामुळे पुढील आदेश होण्यासाठी दाखल केला आहे. आरोपींतर्फे विधीज्ञानी 'योग्य ते आदेश करावेत' असे म्हणणे दाखल केले.

०२. अभियोजन पक्षाने आरोपीविरुध्द दिनांक ३०.०१.२०२० रोजी महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये अंतिम अहवाल दाखल केला आहे. भियोजन पक्षाने रासायनिक परिक्षण अहवाल प्राप्त करण्यासाठी न्याय संचालक सहा. वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना, मुंबई यांना अहवाल सादर करून सी.ए.रिपोर्ट प्राप्त झाला आहे.

०३. अंतिम अहवालावरुन अन्वेषण अधिकाऱ्याने आरोपींच्या ताब्यातून उपरोक्त दारुचा मुद्देमाल जप्त केला आहे असे दिसते. आरोपीने योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

०४. आरोपींविरुध्द खटला प्रलंबीत आहे. पोलीस ठाण्यामध्ये मुद्देमाल ठेवण्यास जागा अपुरी असल्यामुळे फौ.प्र.सं.,१९७३ चे कलम ४५१ व ४५७ फौजदारी नियमावली प्रकरण क्र.६ परि.क्र.८० सोबत महाराष्ट्र दारू बंदी

अधिनियम, १९४९ चे कलम १४३ अन्वये बहाल झालेल्या शक्तीनुसार राज्य शासनाने तयार केलेल्या नियमानुसार म्हणजेच मुंबई दारुबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढून घेतलेल्या वस्तु (विल्हेवाट) नियमन, १९५३ नुसार जप्त मुद्देमालाबाबत आदेश पारीत करणे गरजेचे आहे, म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे, कोलाड यांचा अर्ज नि. क्र.१४ मंजूर करण्यात येतो.

२. प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे, कोलाड यांनी कोलाड प्रो. वा. गु. क्र.७८/२०१९ मधील जप्त दारुच्या मुद्देमालाबाबत मुंबई दारुबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढून घेतलेल्या वस्तु (विल्हेवाट) नियमन, १९५३ मधील तरतुदींचे अवलोकन व पालन करुन त्यामधील नियम क्रमांक ०२ नुसार जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, रायगड यांच्याकडून सत्वर आदेश प्राप्त करुन घेवून जप्त दारुच्या मुद्देमालाची कायदेशीर विल्हेवाट लावावी.

Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2020.12.22 12:38:17 +0000

(स. दि. कमलाकर)

दिनांकः २२.१२.२०२० प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा